# पिक परिस्थिती

गोंदिया जिल्हयात प्रामुख्याने खरीपामध्ये भात पिकाची लागवड करण्यात येते. जिल्हयात एकुण लागवडीखालील क्षेत्र २,२०,००० हेक्टर आहे. त्यापैकी भाताचे सर्वसाधारण क्षेत्र १,७७,९०० हेक्टर आहे.जिल्हयात १२.६.२०१० पासुन पावसाला सुरुवात झाली. व ९.६.२०१० पासुन साधारणतः भात पिकाचे नर्सरी टाकण्याचे कामाला सुरुवात झाली तसेच जुलै महिण्याचे दुसऱ्या हप्त्यापासुन भात पिकाची रोवणीची कामे सुरु झाली. दिनांक १५.७.२०१० ते २३.७.२०१० पर्यंत काही तालुक्यात पाऊस कमी झाल्याने रोवणीची कामे पावसाची सोय असलेल्या ठिकाणी सुरु होती परंतु दिनांक २४.७.२०१० पासुन पुन्हा पावसाला सुरुवात झाली. व रोवणीच्या कामाला सुरुवात झाली. खरीप हंगामातील भात पिकाची तसेच इतर पिकाची पेरणीची कामे पुर्ण झाली . हलका भात गर्भाअवस्थेत ,मध्यम व भारी भात वाढीचे व फुटवे अवस्थेत असताना भात पिकावर अल्प प्रमाणात करपा, खोडकिडा, पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दिसुन आला परिस्थिती नुकसान पातळीचे आत होते.तसेच नियंत्रणासाठी पंचायत समिती स्तरावर नियंत्रणाची उपाययोजना व मार्गदर्शन करण्यात आले.

माहे सप्टेबंर महिण्यात दिनांक ७,८,.९.२०१० झालेल्या अतिवृष्टीमुळे गोरेगाव,३.३ हे,अ/मोरगाव १४२४.९ हे.,सडक/अ ६०० हे. असे एकुण २०२८.२ हे. क्षेत्र ५० टक्केचे आत तसेच गोरगाव २.६८ हे., अ/मोर.७७५.१ हे.,असे एकुण ७७७.७८ हे.क्षेत्रावर भात पिकाचे ५० टक्केचे वर नुकसान झालेले आहे.

तसेच दिनांक १७.९.२०१० च्या काळात खरिप हंगामातील धान पिकावर खोडकिडा ४१८२ हे. क्षेत्रावर प्रार्दुभाव होता त्याची तीव्रता १.१२ टक्के होती ४५५३ हे.क्षेत्र नुकसानपातळीचे आत होते, पानेगुंडाळणारी अळीचा ९४१ हे. क्षेत्रावर प्रार्दुभाव होता त्याची तीव्रता ०.११ टक्के होती ९२८ हे.क्षेत्र नुकसानपातळीचे आत होते, लष्कारी अळी ६५२ हे. क्षेत्रावर प्रार्दुभाव होता त्याची तीव्रता ०.२५ टक्के होती ४२० हे.क्षेत्र नुकसानपातळीचे आत होते, करपा ३६७९ हे. क्षेत्रावर प्रार्दुभाव होता त्याची तीव्रता ०.७८टक्के होती ३१८९ हे.क्षेत्र नुकसानपातळीचे आत होते. गादमाशी १२०० हे. क्षेत्रावर प्रार्दुभाव होता त्याची तीव्रता ०.४२ टक्के होती १०३८ हे.क्षेत्र नुकसानपातळीचे आत होते. यावर किड व रोग नियंत्रणाचे मार्गदर्शन करण्यात आले व त्यानुसार शेतकऱ्यांनी नियंत्रणाचे उपाय केले असुन किड व रोग नियंत्रणात ठेवण्याची कार्यवाही केलेली आहे.

ऑक्टोबंर महिण्याचे शेवटच्या आठवडयापासुन भात पिकाच्या कापणीला सुरुवात झाली. तसेच मळणीची सुध्दा कामे सुरु होती. दिनांक १२.११.२०१० ला जिल्हयात सरासरी ४.८ मि.मी. , दिनांक १४.११.२०१० ला सरासरी ७.६ मि.मी., व दिनांक १९.११.२०१० ला २.९ मि.मी. सरासरी पाऊस झालेला आहे. सदर पावसामुळे ५० टक्केचे आत गोंदिया-५१६ हे,तिरोडा-२०९८ हे.,सडक/अ-३३१४ अ/मोरगाव-१२००, आमगाव- १५६८ हे., असे एकुण ६५९८ हे. क्षेत्राचे नुकसान झालेले आहे तसेच ५० टक्के पेक्षा जास्त तिरोडा ४९२ हे.क्षेत्र असे एकुण ४९२ हे. क्षेत्रावर ५० टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. सध्या वातावरण चांगले असल्यामुळे खरिप हंगामातील भात पिकाची कापणी व मळणीची कामे जोमात सुरु आहे. येत्या १५.१२.२०१० पर्यंत सदर कामे पुर्ण होतील.तसेच तुर पिक सध्य फुलोरा व शेंगा धरण्याचे अवस्थेत असताना झालेल्या पावासामुळे तुर पिकाचे फुलोरा गळालेला होता आता वातावरण चागंले असल्यामुळे तुर पिकास पुन्हा फुलोरा धरत असुन शेंगा धरण्यासही सुरुवात झाली आहे . रब्बी हंगामातील पिकाची पेरणीची कामे सुरु आहेत. गहु ८१८ हे., हरभरा १९०० हे.,लाखोडी ९४८८ हे.,जवस ८४३१ हे. तसेच इतर पिके असे एकुण २३६१७ हे.क्षेत्रावर पेरणीची कामे झालेली आहे. सध्या पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया